**<u>नवी मुंबई महानगरपालिका</u>**

**महानगरपालिका सचिव कार्यालय, नवीन मुख्यालय, 3 रा मजला, बेलापूर, नवी मुंबई 400 614.**

**-: <u>सर्वसाधारण सभेची नोटीस</u> :-** **दिनांक 09/12/2015.**

नवी मुंबई महानगरपालिकेची **<u>डिसेंबर महिन्याची सर्वसाधारण सभा, शुक्रवार, दिनांक 18 डिसेंबर 2015 रोजी सकाळी 11.00 वाजता</u>** बेलापूर, भुखंड क्रमांक 01, सेक्टर 15ए, नवी मुंबई महानगरपालिका, नवीन मुख्यालय येथील 5 व्या मजल्यावरील **<u>राजमाता जिजाऊ सभागृह</u>** येथे खालील विषयांवर विचार करण्यासाठी भरेल :-

**1.** इतिवृत्त.

**2.** प्रश्नोत्तरे.

**3**. स्वच्छ भारत अभियान अंतर्गत होणा-या शहर मानांकन सर्वेक्षणाची माहिती महासभेस अवगत करणेबाबत.

**4.** नवी मुंबई महानगरपालिकेच्या सन्मा.पदाधिकारी व अधिकारी यांचे वाहन प्रतिपुर्ती भत्यामध्ये वाढ करणेस मंजूरी मिळणेबाबत.

**5 व 6. श्री. राजू रामा कांबळे, यांजकडून :-**

**(5)** प्र. क्र.11, ऐरोलीगांव येथील साईनाथवाडी, दत्तगुरु चाळीच्या परिसरात पेवरब्लॉक बसविणे. **(6)** प्र. क्र.11, छत्रपती रहिवाशी कॉलनी येथील श्री. संदीप गवस यांच्या घराजवळ व परिसरात पेवरब्लॉक बसविणे.

**7 व 8. श्री. आकाश बाळकृष्ण मढवी, यांजकडून :-**

**(7)** प्र. क्र.14, से. 19 मधील युरो स्कुल ते रिध्दी सिध्दी अपार्टमेंट पर्यंतच्या फुटपाथची सुधारणा करणे. **(8)** प्र. क्र.14, से. 19 मधील भुमी कोळसा ते कलश पार्क पर्यंतच्या फुटपाथची सुधारणा करणे.

**9. श्री. निवृत्ती शंकर जगताप, यांजकडून :-**

नवी मुंबई महानगरपालिकेने U.P.S.C. व M.P.S.C. चे प्रशासकिय प्रशिक्षण देण्यासाठी स्वत:ची प्रशासकिय शिक्षण संस्था निर्माण करावी. U.P.S.C. व M.P.S.C. चे प्रशासकिय प्रशिक्षण देणारी नवी मुंबई महानगरपालिका म्हणून देशात व राज्यात ओळखली जावी. जेणेकरुन नव्या मुंबईतील तरुण विद्यार्थी मुले, मुली यांना प्रशासकिय सेवा करण्याची सुवर्णसंधी उपलब्ध होईल. देशात व राज्यात केंद्र सरकार व राज्य सरकार यांच्या माध्यमातून U.P.S.C. चे प्रशासकिय प्रशिक्षण देणाऱ्या प्रशासकिय शिक्षण संस्था आहेत. ठाणे महानगरपालिका हि एकमेव महानगरपालिका 'स्वर्गीय चिंतामणराव देशमुख प्रशासकिय शिक्षण संस्था' या प्रशासकिय शिक्षण संस्थेच्या माध्यमातून सन 1987 सालापासून U.P.S.C. चे प्रशासकिय प्रशिक्षण देत आहे. नवी मुंबई महानगरपालिकेने U.P.S.C. व M.P.S.C. चे प्रशासकिय प्रशिक्षण देणारी स्वत:ची प्रशासकिय शिक्षण संस्था निर्माण करणे.

**10. श्रीम. शुभांगी ज्ञानेश्वर पाटील, यांजकडून :-**

न.मु.म.पा. च्या परिसरातील जनतेला भरमसाठ प्रॉपर्टी टॅक्स येत आहे. त्यामुळे येथील नागरीक ते भरत नाहीत. महानगरपालिका मुळ रक्कमेवर व्याज/दंडव्याज आकारते परिणामी येथील नागरीक प्रॉपर्टी टॅक्स भरत नाहीत. त्यामुळे मार्च 2016 पर्यंत नागरीकांना लावण्यात येणारे व्याज/दंडव्याज माफ करणे.

**11. श्री. सुरेश शिवाजी कुलकर्णी, यांजकडून :-**

प्र. क्र.68, तुर्भे स्टारेअर विभागातील नोडसमधील रस्त्यांवरील ठराविक ठिकाणी विदयूत पोल व पथदिवे आहेत मात्र काही ठिकाणी विदयूत पोल व पथदिवे अजिबातच अस्तीत्वात नसल्याने तसेच काही विदयूत पोल पुर्णपणे सडून गेले आहेत परिणामी हे विदयूत पोल सुरु नसल्याने सर्वत्र काळोख पसरुन नागरीकांच्या संरक्षणाला बाधा होते. परिणामी चोऱ्या व लूटमारीचे प्रकार वाढत चालले आहेत. तरी लवकरात लवकर या ठिकाणी विदयूत पोल व पथदिवे बसविणे.

**12. सौ. संगिता वसंत वास्के, यांजकडून :-**

प्र. क्र. 69, वारलीपाडा, गणपतीपाडा ई. विभागातील नोडसमधील रस्त्यांवरील ठराविक ठिकाणी विदयूत पोल व पथदिवे आहेत. मात्र काही ठिकाणी विदयूत पोल व पथदिवे अजिबातच अस्तीत्वात नसल्याने सर्वत्र काळोख पसरुन नागरीकांच्या संरक्षणाला बाधा होते. परिणामी चोऱ्या व लूटमारीचे प्रकार वाढत चालले आहेत. तरी लवकरात लवकर या ठिकाणी विदयूत पोल व पथदिवे बसविणे.

**13. सौ. मुद्रिका मधुकर गवळी, यांजकडून :-**

प्र. क्र.70, तुर्भे स्टोअर-1 विभागातील नोडसमधील रस्त्यांवरील ठराविक ठिकाणी विदयूत पोल व पथदिवे आहेत. मात्र काही ठिकाणी विदयूत पोल व पथदिवे अजिबातच अस्तीत्वात नसल्याने तसेच काही विदयूत पोल पुर्णपणे सडून गेले आहेत. परिणामी हे विदयूत पोल सुरु नसल्याने सर्वत्र काळोख पसरुन नागरीकांच्या संरक्षणाला बाधा होते. परिणामी चोऱ्या व लूटमारीचे प्रकार वाढत चालले आहेत तरी लवकरात लवकर या ठिकाणी विदयूत पोल व पथदिवे बसविणे.

**14. सौ. राधा सुरेश कुलकर्णी, यांजकडून :-**

प्र. क्र.73, इंदिरानगर, गणेशनगर, आंबेडकरनगर, चुनाभटटी, बोणसरी गाव ई. विभागातील नोडसमधील रस्त्यांवरील ठराविक ठिकाणी विदयूत पोल व पथदिवे आहेत मात्र काही ठिकाणी विदयूत पोल व पथदिवे अजिबातच अस्तीत्वात नसल्याने सर्वत्र काळोख पसरुन नागरीकांच्या संरक्षणाला बाधा होते. परिणामी चोऱ्या व लूटमारीचे प्रकार वाढत चालले आहेत तरी लवकरात लवकर या ठिकाणी विदयूत पोल व पथदिवे बसविणे.

**15 ते 17. सौ. सुरेखा अशोक नरबागे, यांजकडून :-**

**(15)** प्र. क्र.103, सीबीडी मधील सेक्टर 8, 8ब आर्टिस्ट व्हिलेज परिसरात तिन्ही बाजूला डोंगर असल्यामुळे सुरक्षिततेच्या दृष्टीकडून मोठया प्रमाणात धोका दिसून येत आहे. म्हणून सीबीडी मध्ये

प्रवेशव्दाराला व चौकाला सी सी कॅमेरा बसविणे. **(16)** प्र. क्र.103, सीबीडी मधील सेक्टर 8, आर्टिस्ट व्हिलेजमध्ये असलेला नाला पुर्णपणे खराब झालेला असून त्या ठिकाणी पावसाळयात ठिकठिकाणी पाणी तुंबत आहे. म्हणून या ठिकाणी कॉंग्रेटची भिंत बांधून या ठिकाणी लोकांना सुविधा देणे. **(17)** प्र. क्र. 103, सीबीडी मधील सेक्टर 8ब मध्ये असलेला धबधबा पालिकेच्या वतीने इतर ठिकाणी आपण सुशोभिकरण केलेले आहे त्याप्रमाणे या विभागात सुध्दा करणे.

**18 ते 20. सौ. दिव्या वैभव गायकवाड, यांजकडून :-**

**(18)** प्र. क्र.64, अंतर्गत वाशी, सेक्टर-8 (आयप्पा मंदिरासमोरील) मुख्य गटारांचे अवस्था दयनिय झालेली आहे व ही गटारे मोडकळीस आलेली आहेत. तरी नवीन गटारे व फुटपाथ बांधणे. **(19)** प्र. क्र. 64, अंतर्गत वाशी, पोलिस स्टेशन ते अे-टाईप मंगलमुर्ती अपार्टमेंट पर्यंतच्या मुख्य गटारांचे अवस्था दयनिय झालेली आहे व ही गटारे मोडकळीस आलेली आहेत. तरी नवीन गटारे व फुटपाथ बांधणे. **(20)** प्र. क्र.64, अंतर्गत जागृतेश्वर शिवमंदिर आहे व या मंदिरात मोठया संख्येने वाशीगांव व पुर्ण वाशीचे शिवभक्त देवाची पूजा व अर्चा करण्याकरिता दररोज येतात व या मंदिराच्या नावाने मंदिराकडे जाणाऱ्या प्रमुख रस्त्यावर प्रवेशव्दार असे येथील जनतेची मागणी आहे. तरी वाशी सेक्टर-7 एम.टी.एन.एल जवळ जागृतेश्वर शिवमंदिर प्रवेशव्दार बांधणे.

**21 ते 23. सौ. शशिकला अनंत सुतार, यांजकडून :-**

**(21)** प्र. क्र.10, ऐरोली, सेक्टर-20 बी येथील श्री स्वामी प्रसन्न सोसायटी ते जयहिंद विदयालय पर्यंत गटाराची सुधारणा करणे. **(22)** प्र. क्र.10, ऐरोली, सेक्टर-20 बी येथील भुखंड क्रमांक 85 ते 87 पर्यंत गटाराची सुधारणा करणे. **(23)** प्र. क्र.10, ऐरोली, सेक्टर-20 बी येथील गणपती मंदिर ते ब्रम्हराज सोसायटी पर्यंत गटाराची सुधारणा करणे.

**24 ते 26. सौ. रुपाली किस्मत भगत, यांजकडून :-**

**(24)** प्र. क्र.96, नेरुळ, सेक्टर-16ए, 16 व 18 येथे आकर्षक प्रवेशव्दार बांधणे. **(25)** प्र. क्र.96, नेरुळ, सेक्टर-16ए येथील मिनाक्षी सोसायटी ते सिसिला सोसायटी समोरील गटाराची अवस्था खराब झाली आहे, गटाराला ठिकठिकाणी खडडे पडले आहेत त्यामुळे तेथे अपघात होण्याची शक्यता आहे. म्हणून मिनाक्षी सोसायटी ते सिसिली सोसायटी समोरील गटार नव्याने बांधणे. **(26)** प्र. क्र. 96, नेरुळ, सेक्टर-16 मधील संभाजी राजे उदयानात लहान मुलांसाठी खेळणी असलेल्या ठिकाणी प्रकाश व्यवस्था नाही त्यामुळे संध्याकाळी लहान मुलांना व त्याच्या पालकांना तसेच स्थानिक नागरिकांचा अधारांचा त्रास सहन करावा लगत आहे. त्याबाबत लेखी तक्रार ही माझ्याकडे आल्या आहेत. म्हणून संभाजी राजे उदयानात आकर्षक व जास्त प्रकाश देणारे विद्युत दिवे बसविणे.

**27 ते 29. सौ. उज्वला विकास झंजाड, यांजकडून :-**

**(27)** प्र. क्र. 01, मधील नागरिकांना शौचालयाची संख्या अपुरी असल्यामुळे शौचासाठी उघडयावर किंवा रेल्वे ट्रॅकवर जावे लागते, सदर प्रभागातील चाळी नियोजित असून सेवरेज लाईन टाकणे अत्यंत सोपे जाणार आहे तसेच पालिका, राज्य शासन व केंद्र शासनाने घरोघरी शौचालयाकरिता निधी उपलब्ध केलेला आहे. त्याचा लाभ सेवरेज लाईन टाकल्यामुळे सदर प्रभागातील नागरिकांना घेता येईल. तरी लवकरात लवकर सदर प्रभागात सेवरेज लाईन टाकणे. **(28)** प्र. क्र. 01, मध्ये बालीनगर परिसरात 465 रुम असून 465 घरांमध्ये 9 स्त्री व 9 पुरुष असे एकूण 18 सीटचे 1 शौचालय असून 465 घरांची संख्या लक्षात घेता ते अपुरे पडत असून सदर बैठे शौचालया जागी 1+1 दुमजली शैचालय बांधणे. **(29)** प्र. क्र. 01, मधील बंजारपाडा येथे असलेल्या बौध्द विहाराचे नुतनीकरण करणे, अंत्यत गरजेचे आहे. सदर बौध्द विहाराची दुरावस्था झालेली असून गेली अनेक वर्षे त्याची दुरुस्ती झालेली नाही. तरी सदर बौश्द विहाराचे नुतनीकरण करणे.

**30 ते 32. सौ. सरोज रोहिदास पाटील, यांजकडून :-**

**(30)** प्र. क्र.101, सेक्टर 21/22 आयकर कॉलनी मधील भुखंड क्र. 13/बी हा येथील रहिवाशांच्या वाहन पार्किंग प्रयोजनासाठी आरक्षित आहे. तसेच सदर भुखंडाची मालकी नवी मुंबई महानगरपालिकेला पुर्णपणे प्राप्त झाली आहे. तरी सदर भुखंडावर अत्याधुनिक पध्दतीची पार्किंग प्रणाली विकसीत करण्यात यावी तसेच सदर भुखंडावर अतिक्रमण होऊ नये यासाठी संरक्षण भिंत उभारणे. **(31)** प्र. क्र.101, मधील आग्रोळी गावाअंतर्गत मुळ गावठाणामध्ये इंटरलॉक बसविणे. **(32)** प्र. क्र. 101, मधील सेक्टर 30/31 मधील मुख्य व अंतर्गत रस्त्यावर पदपथ बसविण्यात यावे तसेच पथदिव्यांची प्रणाली उभारणे.

**33. सौ. संगीता दिलीप बोऱ्हाडे, यांजकडून :-**

प्र. क्र.76, सानपाडा मधील सेक्टर 4 येथे फेरीवाला भुखंडावर बहुददेशिय इमारत उभी करणे

**34 ते 36. सौ. दिपाली सुरेश संकपाळ, यांजकडून :-**

**(34)** प्र. क्र. 35, घरोंदा येथील संपुर्ण प्रभागामध्ये सी.सी.टी.व्ही.(C.C.T.V.) कॅमेरे बसविणे. **(35)** प्र. क्र.35, घरोंदा-सिम्पलेक्समधील रस्ते आणि पदपथांची सिडकोने गेल्या 10 वर्षात देखभाल न केल्यामुळे येथील रस्ते व पदपथांची दुरावस्था झाली आहे. त्यामुळे नवी मुंबई महानगरपालिकेने जबाबदारीने प्र. क्र.35 मधील दुरावस्था झालेल्या रस्त्यांची व पदपथांची तातडीने दुरुस्ती व पुर्नबांधणी करणे. **(36)** प्र. क्र.35, मधील रोडवर स्पीडब्रेकर टाकणे.

**37 ते 39. सौ. तनुजा श्रीधर मढवी, यांजकडून :-**

**(37)**प्र. क्र. 83, जुईनगरच्या अंतर्गत ठिकठिकाणी असलेल्या चौकांचे व रस्त्यांचे नामफलकांच्या टाईल्स फुटतात व खाली पडतात तसेच वाहनांचा धक्का लागल्यामुळे वारंवार खराब होतात व त्यामुळे दुरुस्ती करावी लागते बऱ्याच वेळा दुरुस्ती वेळेवर न झाल्याने सदर नामफलक विद्रुप स्थितीत दिसतात. तरी नामफलकांची सदर दयनिय अवस्था टाळण्यासाठी सदर

ठिकाणी लोखंडी खांबांचे स्टँड व त्यावर लोखंडी फलक बनवुन रेडियमने नांवे टाकणे. **(38)** प्र. क्र. 83, जुईनगर येथे एक नागरी आरोग्य केंद्र लवकरात लवकर बनवणे. **(39)** प्र. क्र.83, जुईनगर येथे दर महिन्यास स्वच्छता मोहीम घेण्यात यावी व त्यासाठी लागणारे जादा कामगार जे.सी.बी. व डंपर पुरविणे.

**40 व 41. सौ. संगीता संदीप म्हात्रे, यांजकडून :-**

**(40)** प्र. क्र.45, से. 3, 6 व 7 मधील कंडोनियम अंतर्गत गटारावरील लोखंडी जाळया काढुन सिमेंटच्या नळया (half Raam) बसविणे. **(41)** प्र. क्र. 45, से. 3, 6 व 7 मधील सर्व मुख्य रस्त्यांचे डांबरीकरण करणे.

**42 ते 44. श्रीम. प्रज्ञा प्रभाकर भोईर, यांजकडून :-**

**(42)** प्र. क्र. 53, नोड 1 जुईगांव मधील झेडपी रोडचं डांबरीकरण करण्यात यावे, सदर रोडची परिस्थिती फार बिकट आहे व गेली 7-8 वर्षापासुन या रोडचं डांबरीकरण करण्यात आले नाही. तरी लवकरात लवकर या रोडच डांबरीकरण करणे. **(43)** प्र. क्र. 53, नोड 1 मधील से. 12 येथील पदपथाची दुरुस्ती करणे. से. 12 मधील काही विभागाची फुटपाथ दुरुस्ती करण्यात आली आहे तर काही विभागाची परिस्थिती फार बिकट आहे तरी उर्वरित प्रभागातील फुटपाथ व गटाराची दुरुस्ती करणे. **(44)** प्र. क्र. 53, नोड 1 जुहू गांव मधील शाळा क्र 29 कै. रामा नामा भोईर या शाळेचा एक मजला वाढविण्यात यावा. सदर शाळेला फार लिकेज असल्यामुळे पंखे व टयुबलाईट यावर फार परिणाम होत आहे, शॉटसर्किटमुळे जळुन जातात तरी एक मजला वाढविल्यामुळे लिकेज बंद करणे.

**45 ते 47. श्री. संजू आधार वाडे, यांजकडून :-**

**(45)** प्र. क्र. 12, से. 2 मधील सावित्रीबाई फुले अभ्यासिका केंद्रालगत सिडकोचे मोकळया भुखंडावर आय. ए. एस., आय. पी. एस. ॲकेडमी स्थापना करणे. **(46)** प्र. क्र. 12, से. 2 मधील अमृतवेल सोसायटी, पुर्वांचल सोसायटी, वसुंधरा सोसायटी हया सोसायटींमध्ये पाणी खुप कमी प्रमाणात येत असून हया तसेच इतर सोसायटयांमध्ये पाण्याची पर्यायी व्यवस्था करणे. **(47)** प्र. क्र.12, से. 2 मधील तरुण मुलांसाठी तक्षशिला बुध्द विहाराच्या मागील बाजुस मोकळया भुखंडावर व्यायाम शाळा उपलब्ध करुन देणे.

**48 ते 50. श्री. रामदास बबनराव पवळे, यांजकडून :-**

**(48)** प्र. क्र.49, सेक्टर 9 चे संत भगवान बाबा व वामन भाऊ गार्डनमध्ये नवीन खेळणे सिनियर सिटीझनसाठी बसण्याचे बाक, तसेच सेक्टर 10 चे व 8 अे तसेच सेक्टर 7 बी चे गार्डन मध्ये खेळणी, बसण्याचे बाक नवीन बनविणे. **(49)** प्र. क्र. 49, सेक्टर 9 मधील साईकृपा व साईनाथ सोसायटी अंतर्गत पेव्हर ब्लॉक बसविणे. **(50)** प्र. क्र. 49, सेक्टर 9 मधील प्लॉट क्र. 16 अे, हा हेल्थसाठी राखीव आहे. त्या ठिकाणी बहुददेशीय इमारत उभारणे.

**51 ते 53. सौ. श्रध्दा साजूराम गवस, यांजकडून :-**

**(51)** प्र. क्र. 94, सेक्टर-10 मधील राजकमल मार्केट, जय भवानी मार्केटच्या कोपऱ्यावर हायमास्ट दिवे लावणे. **(52)** प्र. क्र. 94, सेक्टर-10 जय भवानी मार्केट, नेरुळ मधील अंतर्गत पदपथ क्रॉक्रीटीकरण करुन त्यावर पेव्हर ब्लॉक बसविणे. **(53)** प्र. क्र. 94, सेक्टर-10, नेरुळ येथील षटकार ओनर्स असोसिएशन मधील चाळ नं. 45, 60 व 64 या ठिकाणी समोरील मोकळया मैदानामध्ये पेव्हर ब्लॉक बसविणे.

**54 व 55. सौ. सायली नारायण शिंदे, यांजकडून :-**

**(54)** प्र. क्र. 37, अंतर्गत, प्लॉट नं. 8 व 9, से. 1A, टिंबर मार्केट मधील नाल्यावरील ब्रीज व त्या समोरिल रस्ता यांचे नव्याने नुतनीकरण करणे. **(55)** प्र. क्र. 37, अंतर्गत, प्लॉट नं. 37 वर सार्वजनिक सोयी-सुविधांसाठी ठेवण्यात आलेल्या राखीव भुखंडावर व्यायामशाळा व बहुउददेशीय इमारत करणे

**56 व 57. श्रीम. ऋचा रामचंद्र पाटील, यांजकडून :-**

**(56)** प्र. क्र. 79, भुखंड क्र. 3, सेक्टर-9 सानपाडा येथे 14,000 sq Meter चे मैदान आहे त्या मैदानात अदयावत क्रिडा प्रशिक्षण केंद्र उभारणे. **(57)** प्र. क्र. 79, सेक्टर-8 सानपाडा भुखंड क्र. 3, हा भुखंड 6,300 sq Meter चा असुन सन 2007 पासुन आपल्याकडे उदयानासाठी हस्तांतरण करण्यात आला आहे. तेथे नाना-नानी पार्क उभारणे.

**58 व 59. श्री. गणेश गंगाराम म्हात्रे, यांजकडून :-**

**(58)** प्र. क्र.111, मध्ये सकाळी व संध्याकाळी वॉक करण्यासाठी वॉकींग ट्रॅक नाही. या ठिकाणी जेष्ठ नागरिक, महिला तसेच इतर सर्व नागरिक पामबिच मार्गालगत वॉक करत असतात परंतु ते फारच धोकादायक असल्याने नागरिकांच्या सुरक्षेच्या दृष्टीने हायवे पासून दुर असे वॉकिंग ट्रॅक हवे आहे. तरी सेक्टर 58 अे मधील खाडी भोवताली असे वॉकिंग ट्रॅक तयार करणे. **(59)** प्र. क्र. 111, मध्ये राहणाऱ्या नागरिकांच्या तसेच कामानिमित्त या ठिकाणी येणाऱ्या नागरिकांच्या सोयीसाठी एकही सुलभ शौचालय नाही. त्यामुळे तेथील व तेथे येणाऱ्या नागरिकांची फारच गैरसोय होत आहे. सेक्टर 44 अे मध्ये धारा कॉम्पलेक्स शेजारी, मित्तल इलेक्ट्रीकल सबस्टेशन शेजारी जागा उपलब्ध आहे. त्या जागेशेजारी मे. मित्तल यांनी हॉस्पीटलची इमारत देखील उभी केलेली आहे. भविष्यात हॉस्पीटल कार्यान्वीत झाल्यानंतर नागरिकांची अजून जास्त गैरसोय होईल तरी त्या जागेवर सुलभ शौचालय तयार केल्यास परिसरातील नागरिकांची गैरसोय दूर होईल. तरी त्या ठिकाणी सुलभ शौचालय तयार करणे.

**60 ते 62. श्रीम. वैशाली तुकाराम नाईक, यांजकडून :-**

**(60)** प्र. क्र.51, सेक्टर-12 कोपरखैरणे येथील लहान मुलांचे खेळण्याचे गार्डनची अवस्था खूप वाईट झाली आहे. त्या गार्डनचे पुर्ण नुतनीकरण करणे. **(61)** प्र. क्र. 51, सेक्टर-11 कलश उदयान समोर फुटपाथवर जेष्ठ नागरिकांना बसण्यासाठी जे बेंचेस लावले आहेत त्याची संख्या वाढवून तेथे प¦याची शेड बांधणे. **(62)** प्र. क्र. 51, सेक्टर-12 कलश सोसायटी, फाम सोसायटी जवळ असणारे फुटपाथ वरील इंटरलॉक आणि गटारांची झाकणे बदलणे.

**63 ते 65. श्री. लक्ष्मीकांत नामदेव पाटील, यांजकडून :-**
**(63)** प्र. क्र. 27, अंतर्गत आवश्यक तेथे पाणपोया बसविणे. **(64)** प्र. क्र. 27, सेक्टर-29 मध्ये सिध्दीविनायक, सुखशांती व धोंडूपाटील चाळ येथे मलनि:स्सारण वाहिन्या टाकणे. **(65)** प्र. क्र. 27, अंतर्गत रस्ते व हेव्ही डयुटी गटार बांधणे.

**66 ते 68. सौ. मोनिका लक्ष्मीकांत पाटील, यांजकडून :-**
**(66)** प्र. क्र. 28, घणसोली अंतर्गत सेक्टर-21 मध्ये हायमास्ट लावणे. **(67)** प्र. क्र.28, अंतर्गत घणसोली दत्तनगर येथे अंगणवाडी सुरु करणे. **(68)** प्र. क्र. 28, अंतर्गत जलकुंभ उभारणे.

**मा. महापौरांच्या आदेशावरून,**

**सही/-**
**(चित्रा बाविस्कर)**
**महानगरपालिका सचिव,**
**नवी मुंबई महानगरपालिका.**

**महापालिका सचिव कार्यालय,**
**नवी मुंबई महानगरपालिका,**
**दिनांक 09 डिसेंबर 2015.**